वाचले :-

१. दि. २७/०९/२०२१ रोजीचा सभावृत्तांत.

२. मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. १०४१७, दि. ०६/१०/२०२१.

३. मा.महापालिका सभा ठराव क्र. ७१२, दि. २०/१०/२०२१.

४. कर्मचारी मान्यताप्राप्त संघटनेबरोबर झालेला दि.०९/१०/२०२१ रोजीचा करारनामा.

५. आदेश क्र.प्रशा/१८/कावि/८५१/२०२१, दि. ११/१०/२०२१.

६. आदेश क्र.प्रशा/१८/कावि/७२९/२०२२, दि. ०६/१०/२०२२.

७. आदेश क्र.साप्रवि/१८/कावि/१०१३/२०२३, दि. ०९/१०/२०२३.

८. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ यांचेकडील दि. १०/०९/२०२४ रोजीचे निवेदन.

९. सामान्य प्रशासन विभागाकडील दि. २३/०९/२०२४ रोजीचे मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका<br>
पिंपरी - ४११०१८,<br>
सामान्य प्रशासन विभाग,<br>
क्र.साप्रवि/१८/कावि/ ९४१/२०२४,<br>
दि. ०१ / १० /२०२४

विषय :- महापालिका अधिकारी व कर्मचारी यांना सन २०२३-२४ वर्षाकरीता ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु. २०,०००/- अदा करणेबाबत.

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ यांनी सन २०२० - २०२१ आणि त्यापुढील चार वर्षासाठी ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा रक्कम मंजुरीकामी मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. अध्यक्ष - स्थायी समिती, मा. पक्षनेते, मा. विरोधीपक्ष नेते व इतर पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी महासंघाचे प्रतिनिधी यांच्यामध्ये दिनांक २७/०९/२०२१ रोजी चर्चा झाली होती. त्यामध्ये महापालिका आस्थापनेवरील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना सन २०२० - २०२१ या वर्षासह पुढील ४ वर्षासाठी ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु. २०,०००/- मान्य करणेत आलेले असून मा. स्थायी समिती सभेने ठराव क्र. १०४१७, दि. ०६/१०/२०२१ व मा. महापालिका सभेने ठराव क्र. ७१२, दि. २०/१०/२०२१ नुसार अदा करणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्याप्रमाणे मान्यताप्राप्त संघटनेबरोबर दि. ०९/१०/२०२१ रोजी सन - २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ असे ५ वर्षाकरिता ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु. २०,०००/- मंजुरी बाबत करारनामा करणेत आलेला आहे. त्यानुसार सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षातील यथाप्रमाण ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु. २०,०००/- यापूर्वी अदा करण्यात आलेले आहे. सन २०२३-२४ या वर्षाकरिता ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु. २०,०००/- अदा करावयाचे आहे.

सबब सन २०२३-२४ या वर्षाकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व वर्ग १ ते ४ मधील अधिकारी व कर्मचा-यांना ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा रक्कम रु.२०,०००/- खालील निकषानुसार देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) सन २०२३-२४ मध्ये जे कार्यरत अधिकारी / कर्मचारी वेतनश्रेणीमध्ये आहेत. त्यांना व रजा राखीव वैद्यकिय अधिकारी आणि रजा राखीव नर्सेस तसेच अधिसंख्य पदावरील कर्मचा-यांना एक महिन्याच्या वेतनाइतकी वित्तलब्धी (इतर भत्ते वगळून) म्हणजेच ८.३३% इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून व जादा र.रु.२०,०००/- देय राहील. एका वर्षामध्ये सहा महिन्या पासून पूर्ण वर्षापर्यंत सलग सेवेचा कालावधी यथाप्रमाण ८.३३% सानुग्रह अनुदान आणि यथाप्रमाण जादा र.रु.२०,०००/- देय राहील. सहा महिन्यापेक्षा कमी सेवा झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु. २०,०००/- देय राहणार नाही. तथापि ज्या रजा राखीव वैद्यकिय अधिकारी आणि रजा राखीव नर्सेस यांच्या नेमणुका वेतनश्रेणीत करण्यात आलेल्या आहेत व त्यांना काही दिवस ब्रेक देऊन पुन्हा वेतनश्रेणीत नेमणुका देण्यात आल्या आहेत अशांच्या बाबतीत खंडित सेवेचा कालावधी वगळता यथाप्रमाण ८.३३% सानुग्रह अनुदान व यथाप्रमाण जादा र.रु.२०,०००/- अनुज्ञेय राहील.

२) ८.३३% सानुग्रह अनुदानाची रक्कम ही मार्च २०२४ च्या वित्तलब्धीवर अदा करण्यात येईल. त्यामध्ये वेतन मर्यादा राहणार नाही.

(कृ.मा.प.)

३) महापालिकेतील अधिकारी / कर्मचा-यांना दि. ०२/०३/०२४ ते दि. ३१/०३/०२४ या दिनांकादरम्यान पदोन्नती किंवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेतंर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी लागु केली आहे.अशा कर्मचा-यांना ८.३३% सानुग्रह अनुदान अदा करण्याकामी त्यांचे मूळ पदावरील वेतन विचारात घ्यावे. पदोन्नतीच्या पदाचे वेतन किंवा वरिष्ठ वेतनश्रेणीमधील वेतन विचारात घेऊ नये.

४) वित्तलब्धी या संज्ञेत मूळवेतन, वैयक्तिक वेतन, महागाई भत्ता,प्रतिनियुक्तीवरील भत्ता, व्यवसायरोध भत्ता याचा समावेश असेल. तथापि घर भाडे भत्ता, पूरकभत्ता, वैद्यकीय भत्ता व इतर बाबीचा समावेश करण्यात येऊ नये.

५) बालवाडी शिक्षकांना खालील सुत्रानुसार जादा रक्कम देय राहील.

जादा र.रु. २०,०००/- ÷ ३६६× हजर दिवस = द्यावयाची जादा रक्कम

६) सन २०२३-२४ या वर्षामध्ये सहा महिन्यापासून संपूर्ण आर्थिक वर्षात ज्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी यात मानधनावरील अधिकारी / कर्मचारी, मानधनावरील वैद्यकीय अधिकारी आणि समूह संघटक, DAY NULM अधिकारी/कर्मचारी व तासिका तत्वावर नेमलेले कर्मचारी, महापालिका आस्थापनेवर करार पध्दतीने / मानधनावर नेमलेल्या तसेच शासनाकडून पगारापोटी अनुदान मिळणा-या सर्व अधिकारी / कर्मचारी ज्यांनी काम केले आहे. यांचा समावेश राहिल, त्यांना फक्त र.रु. २०,०००/- यथाप्रमाण देय राहील. मात्र दोन नेमणुकीच्या दरम्यान काही खंडित कालावधी असेल तर तो वगळून यथाप्रमाण सदर रक्कम देय राहील.

७) महानगरपालिका आस्थापनेवरील जे अधिकारी व कर्मचारी सेवानिलंबित आहेत. अशा अधिका-यांना / कर्मचाऱ्यांना त्यांना देण्यात येणाऱ्या निर्वाह वेतनाच्या ८.३३% रक्कम यथाप्रमाण सानुग्रह अनुदान व जादा र.रु. २०,०००/- इतके यथाप्रमाण देय राहील. तसेच जे अधिकारी / कर्मचारी सन २०२३-२४ मध्ये सेवानिलंबित झाले आहेत. अशांच्या बाबतीत त्यांची वेतनश्रेणीतील सेवा व सेवानिलंबन कालावधीतील निर्वाह वेतन विचारात घेऊन यथाप्रमाण ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु. २०,०००/- देय राहील. तसेच गैरहजर / विनावेतनी रजेवरील कर्मचाऱ्यांचे बाबतीत यथाप्रमाण ८.३३% सानुग्रह अनुदान व यथाप्रमाण जादा र.रु. २०,०००/- देय राहील.

८) जे अधिकारी / कर्मचारी सन २०२३-२४ या वर्षात महापालिका सेवेत होते. तथापि नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त, मयत किंवा स्वेच्छा व वैद्यकिय कारणास्तव सेवानिवृत्त झालेले आहेत, राजीनामा दिलेले, सेवेतून कमी केलेले / सेवा समाप्त केलेले अधिकारी / कर्मचारी यांचा सेवाकाल विचारात घेऊन तसेच बदली झालेले प्रतिनियुक्तीवरील अधिकारी / कर्मचारी यांचा सहा महिन्यापेक्षा जास्त असलेला सेवाकाल विचारात घेऊन त्यांना यथाप्रमाण ८.३३% सानुग्रह अनुदान व यथाप्रमाण जादा र.रु.२०,०००/- देय राहील.

९) उपरोक्त ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु. २०,०००/- याबाबत भविष्यामध्ये कुठल्याही प्रकारच्या लेखापरिक्षणात वसूलीबाबतचा आक्षेप अंतिम झाल्यास संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतनातून / निवृत्तीवेतनातून / देय रकमेतून वसूलपात्र राहील. याकरीता वसुलीबाबतची जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखाची राहील.

सर्व शाखाधिकारी व शाखाप्रमुख यांना सुचित करण्यात येते की, सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकामध्ये सानुग्रह अनुदान व जादा रक्कम अदाईगी करण्याच्या लेखाशिर्षाखाली केलेली तरतुद अपुरी पडल्यास तरतुद वर्गीकरणाची नियमाधीन कार्यवाही अलहिदा करावी. तसेच ८.३३% सानुग्रह अनुदान व जादा र.रु. २०,०००/- सर्व अधिकारी/कर्मचा-यांना दिवाळी पुर्वी मिळेल याची दक्षता घ्यावी. त्याबाबतची बिले तयार करुन तातडीने लेखा विभागाकडे सादर करावीत. लेखाविभागाने तातडीने बिले तपासून रक्कम अदाईगी संदर्भातील कार्यवाही करावी. बिलांच्या विलंबाबाबत संबंधित शाखाप्रमुख यांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सही/-

(शेखर सिंह)

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति, सर्व संबंधित शाखाप्रमुख,

प्रत,१.लेखा विभाग २.मुख्य लेखा परीक्षण विभाग,

३.शिक्षण विभाग (शिक्षण मंडळ) ४.कामगार कल्याण विभाग,

५.पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघ.६.माहिती व तंत्रज्ञान विभाग,

२/- माहिती व तंत्रज्ञान विभाग यांनी संगणक प्रणाली तातडीने उपलब्ध करुन द्यावी.

(विठ्ठल जोशी)

उप आयुक्त (साप्रवि)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका